लोकरंगभूमीचे अभ्यासक डॉ. रुस्तुम अचलखांब यांचे निधन

औरंगाबाद : लोककलांचे संशोधन आणि सादरीकरणाचा अजोड मिलाफ असणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील नाट्यशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख रुस्तुम अचलखांब यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्युसमयी ते ७३ वर्षांचे होते. प्रतिभावंत नट, लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक, कुशल दिग्दर्शक अशी त्यांची राज्यभर ओळख होती. त्यांचे 'गावकी' आत्मकथन दलित समाजाच्या व्यथा आणि स्थिती सांगणारे आहे. लोककला आणि नाट्यशास्त्राच्या अभ्यासात शाहिरी परंपरांचे संशोधन करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून रुस्तुम अचलखांब यांची ओळख होती. त्यांचे दलित साहित्यिक चळवळीतही मोठे योगदान होते.

मोठा सायबर हल्ला होण्याची शक्यता

सतर्क राहण्याचा पोलीस महानिरीक्षकांचा सल्ला; हल्लेखोराकडे २० लाखांहून अधिक वापरकर्त्यांचा तपशील

विशेष प्रतिनिधी, मुंबई

बॉटनेटचा वापर करून जगातील अनेक देशातील इंटरनेट सेवा बंद पाडणाऱ्या 'मिराई' या सर्वात मोठ्या सायबर हल्ल्यानंतर आता त्याहीपेक्षा मोठ्या सायबर हल्ल्याची शक्यता आहे. आता हा हल्ला थेट तुमच्या इंटरनेट आधारित उपकरणांवर होणार असून यामुळे इंटरनेट सेवा पूर्णपणे बंद पडणार आहे. यामुळे या हल्ल्यापासून सावध राहण्याचा इशारा राज्य पोलीस दलाच्या सायबर विभागाचे पोलीस महानिरीक्षक ब्रिजेश सिंह यांनी दिला आहे.

२०१६मध्ये 'मिराई' नावाचा सायबर सर्वात मोठा सायबर हल्ला झाला होता. या हल्ल्यामुळे अनेक देशातील इंटरनेट सेवा बंद पडली होती. त्यावेळेस

हल्लेखोराकडे पाच लाख वापरकर्त्यांचा तपशील उपलब्ध होता. आता याहीपेक्षा मोठा सायबर हल्ला होण्याची शक्यता आहे.

या हल्लेखोराकडे तब्बल २० लाखांहून अधिक वापरकर्त्यांचा तपशील उपलब्ध आहे. यामध्ये वैयक्तिक तसेच कॉर्पोरेट वापरकर्त्यांचाही समावेश आहे. यामुळे या वेळेस अधिक धोका असल्याचे जागतिक सायबर सुरक्षा तज्ज्ञांनी सांगितले आहे. हा हल्लेखोर एकाच वेळी हल्ला करण्यापेक्षा हळूहळू हल्ले करत आहे. यामुळे या हल्ल्याची तीव्रता खूप जास्त असली तरी ती एकाच वेळी जास्तीत जास्त लोकांना जाणवणार नाही. परिणामी या हल्ल्याबाबत फारशी चर्चा होणार नाही, असा हल्लेखोरांचा मानस आहे.

पासवर्ड बदला

खबरदारीचा उपाय म्हणून तातडीने आपल्या इंटरनेट आधारित उपकरणाचे वापरकर्ता नाव आणि पासवर्ड बदलावा अशी सूचना केली आहे. तसेच ज्यांनी आपल्या उपकरणाचे 'फर्मवेअर' अद्ययावत केले नाही अशांनी ते करून घ्यावे. जेणेकरून ते या हल्ल्यापासून सुरक्षित राहू शकतील, असेही त्यांनी सिंह यांनी वापरकर्त्यांनी सांगितले.

काय आहे बॉटनेट?

बॉटनेटच्या माध्यमातून एखाद्या उपकरणाचा ताबा घेतला जातो व त्या उपकरणाला त्याच्या नियमित नियंत्रित वापरापेक्षा विचित्र वापराच्या सूचना केल्या जातात. यातून अनेकदा ते उपकरण काम करणे बंद करते तर काही वेळेस उपकरण चुकीच्या गोष्टी करू लागते. ज्यामध्ये स्पॅम मेल पाठविणे, माहिती चोरी करणे अशा विविध कृतींचा समावेश असतो. सध्या जगात काही ठिकाणी उपकरण अशा प्रकारची कृती करू लागले आहेत यामुळे या धोक्याची सूचना मिळाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

उपकरणांना धोका

या बॉटनेट हल्ल्यात इंटरनेट आधारित गोष्टींना लक्ष्य करण्यात आले आहे. यामुळे वाय-फाय राऊटर, इंटरनेटला जोडलेले कॅमेरा, स्टोअरेज बॉक्स, वायफाय पॉइंट्स, हेल्थबँड्स यांसारख्या उपकरणांना याचा धोका पोहोचू शकणार आहे. यामुळे इंटरनेट आधारित उपकरणे वापरणाऱ्या व्यक्ती आणि कंपन्यांनी सतर्क राहावे असा इशारा सिंह यांनी दिला आहे.

यासंदर्भात लवकरच एक मार्गदर्शक परिपत्रक प्रसिद्ध केले जाणार असल्याचे सिंह यांनी सांगितले.

आयसिसमध्ये सहभागी झालेला ठाण्याचा फहाद शेख ठार?

अज्ञात इसमाकडून कुटुंबीयांना दूरध्वनीवर माहिती

एक्स्प्रेस वृत्तसेवा, नवी दिल्ली

इस्लामिक स्टेट (आयसिस) या दहशतवादी संघटनेत सामील होण्यासाठी ठाणे येथून गेलेल्या चार विद्यार्थ्यांच्या गटातील एक असलेला फहाद तन्वीर शेख हा गेल्या आठवड्यात रक्का शहरानजीक लढताना मारला गेल्याची माहिती एका अनोळखी इसमाने त्याच्या कुटुंबीयांना दिली आहे. या चौघांपैकी अरीब मजीद याला अटक झाल्यानंतर आणि शहीम टंकी व अमन तांडेल हे दोघे ठार झाल्यानंतर फहाद शेख हा या गटातील वाचलेला एकमेव सदस्य होता.

मंगळवारी रात्री उशिरा माझ्या पत्नीला कुणीतरी विदेशातील क्रमांकावरून फोन केला आणि आमचा मुलगा ठार झाल्याची माहिती दिली. माझी पत्नी घाबरून गेल्यामुळे, नेमके काय व कुठे झाले याबाबत फोन करणारा देत असलेली माहिती तिने लिहून घेतली नाही, असे फहादचे वडील डॉ. तन्वीर शेख यांनी सांगितले.

हा दूरध्वनी आल्यानंतर डॉ. शेख यांनी ताबडतोब संघटनेला दूरध्वनी केला होता आणि आता आम्ही हा दूरध्वनी कोठून आला होता याचा शोध घेत आहोत, असे राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या (एनआयए) सूत्रांनी सांगितले. तथापि, त्या भागातील हिंसक आणि अनागोंदीची परिस्थिती लक्षात घेता शेख याच्या मृत्यूला कारणीभूत ठरलेली परिस्थिती स्वतंत्रपणे पडताळून पाहण्याचा मार्ग उपलब्ध नसल्याचेही या सूत्रांचे म्हणणे होते.

मजीद, टंकी व तांडेल यांच्यासोबत

उच्चशिक्षीत असूनही...

फहादचा हेतू आणि त्याने इराकला जाण्यासाठी पैशांची सोय कशी केली याबाबत फारशी माहिती मिळू शकलेली नाही. यांत्रिकी अभियांत्रिकीत पदवी घेतल्यानंतर शेखने एअर कंडिशनर फिटिंग व मेंटेनन्सचा अभ्यासक्रमही पूर्ण केला होता आणि इराकला जातेवेळी तो नोकरीच्या शोधात होता. त्याला कुवेतहून दरमहा ३ लाख रुपयांच्या नोकरीचे आमिष दाखविण्यात आले होते. 'त्याने आम्हाला का फसवले हे मला कळत नाही', असेही डॉ. तन्वीर म्हणाले.

अकराशे गावांत नक्षलवाद्यांना बंदी

गडचिरोलीतील १०३६ गावांचा समावेश

वार्ताहर, गडचिरोली

नक्षलवादाच्या समूळ उच्चाटनासाठी गडचिरोली, गोंदिया व चंद्रपूर या पूर्व विदर्भातील तीन जिल्ह्यातील ११८९ गावांनी नक्षलवाद्यांना गावबंदी केली आहे. यामध्ये गडचिरोली जिल्ह्यातील सर्वाधिक १०३६ गावांचा समावेश आहे. त्यापाठोपाठ चंद्रपूर ८० व गोंदिया जिल्ह्यातील ७३ गावांचा समावेश आहे. ही गावबंदी बघता शासनाकडून राबवण्यात येणाऱ्या विकास कामांना गावकऱ्यांनी होकार दिला असून नक्षलवादाला नकार दिला आहे.

गडचिरोली, चंद्रपूर व गोंदिया या पूर्व विदर्भातील तीन जिल्ह्यांत १९८० पासून नक्षलवाद्यांमुळे विकास कामांच्या गतीवर परिणाम झाला आहे. यावर उपाय म्हणून २००३ पासून शासनाकडून नक्षल गावबंदी योजना सुरू करण्यात आली. २००३ मध्ये कोरची तालुक्यातील ३० गावातील नागरिकांनी एकत्र येऊन नक्षल गावबंदी ठराव मंजूर केला होता.

गोंदियात ७३ तर चंद्रपूर ८० नक्षलबंदी गावे

गोंदिया जिल्ह्यात २००३ ते ऑगस्ट २०१७ पर्यंत एकूण ७३ गावात नक्षलवाद्यांना गावबंदी करण्यात आली असून ४० प्रस्ताव शासनाकडून मंजूर झाले आहेत, तर उर्वरित ३३ गावबंदीचे प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आले आहेत. चंद्रपूर जिल्ह्यातील ८० गावात नक्षलवाद्यांना गावबंदी करण्यात आली असून ४६ प्रस्ताव मंजूर झाले, तर उर्वरित ३४ गावबंदीचे प्रस्ताव शासनाकडे पाठवले आहेत.

२००३ पासून यावर्षी ११२ गावांनी नक्षल गावबंदी ठराव घेतला, तर २००४ मध्ये ११५ गावांनी, २००५ मध्ये ७ गावे, २००६ मध्ये ११६ गावे, २००७ मध्ये ८५ गावे, २००८ मध्ये ६५ गावे, २००९ मध्ये ९१ गावे, २०१० मध्ये १० गावे, २०११ मध्ये १०३ गावे, २०१२ मध्ये ६ गावे, २०१३ मध्ये १० गावे, २०१५ मध्ये ८४ गावे, २०१६ मध्ये ८२ गावे तसेच ऑगस्ट २०१७ पर्यंत १४० गावे अशा एकूण १०३६ गावांनी नक्षलवाद्यांना गावबंदी ठराव घेतला आहे.

हे प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी पाठवण्यात आले आहेत. त्यापैकी आतापर्यंत ८७० प्रस्तावांना मंजुरी मिळाली आहे.

१४६ प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आले आहेत. ३० ऑक्टोबर २००३ च्या शासन निर्णयानुसार गावबंदी ठराव घेतलेल्या ११२ गावांना विकास कामाकरिता २ लाख रुपयांप्रमाणे २२४ लाखाच्या निधीचे वाटप करण्यात आले आहे. २००७ मध्ये आदिवासी विकास विभागाच्या वतीने १३ मार्च २००७ च्या शासन निर्णयानुसार गावबंदीच्या निधीत वाढ करून ३ लाख रुपये करण्यात आले.

गिरीश कुबेर यांना प्रबोधनकार ठाकरे समाजप्रबोधन पुरस्कार

प्रतिनिधी, नागपूर

सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीसाठी देण्यात येणारा प्रतिष्ठेचा मारवाडी फाऊंडेशनचा प्रबोधनकार ठाकरे समाज-प्रबोधन पुरस्कार यंदा 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर यांना जाहीर झाला आहे. १ लाख रुपये व मानचिन्ह, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

यापूर्वी हा पुरस्कार डॉ. भा.ल. भोळे, पन्नालाल सुराणा, डॉ. बाबा आढाव, डॉ. आ.ह. साळुंखे, प्रा. एन.डी. पाटील, रामकृष्णदादा बेलुरकर, शरद जोशी, डॉ. सदानंद मोरे, ज्येष्ठ गांधीवादी नेते मा.म. गडकरी यांना प्रदान करण्यात आला आहे.

शनिवारी, २५ नोव्हेंबरला प्रबोधनकार ठाकरे यांच्या स्मृतिदिनी पुरस्कार प्रदान समारंभ आयोजित करण्यात आला आहे. साई सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते आणि माजी केंद्रीय गृहमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांच्या उपस्थितीत कुबेर यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जागतिक कीर्तीचे नाटककार महेश एलकुंचवार उपस्थित राहणार आहेत.

अभ्यासपूर्ण पत्रकारितेचा सन्मान

स्वतःला पक्षीय भूमिकेपासून दूर ठेवून व विषयांचे गांभीर्य लक्षात घेऊन अभ्यासपूर्ण पत्रकारिता करणाऱ्यांपैकी गिरीश कुबेर एक आहेत. त्यांचे या क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान लक्षात घेऊन त्यांची यंदाच्या प्रबोधनकार ठाकरे समाजप्रबोधन पुरस्कारासाठी निवड करण्यात आली, असे फाऊंडेशनचे उपाध्यक्ष गिरीश गांधी यांनी कळवले आहे.

नक्षलवाद्यांची माहिती देणाऱ्यांस एक कोटीपर्यंत बक्षिस

नागपूर : नक्षलवाद्यांची माहिती देणाऱ्यांना राज्य सरकारकडून देण्यात येणाऱ्या बक्षिसाच्या रकमेत यंदा १ कोटीपर्यंत वाढ करण्यात आली आहे.

नक्षलवाद्यांची माहिती देणाऱ्यांना गृह विभागाकडून बक्षीस देण्यात येते. या विभागाने यावेळी या रकमेत वाढ केली आहे. केंद्रीय समिती सचिव किंवा रिजनल ब्युरो सदस्यासाठी ५० लाख पॉलीट ब्युरो सदस्याकरिता ६० लाख आणि भाकप (माओवादी) समूह सचिवाकरिता १ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. खबऱ्यांच्या माहितीच्या आधारावर संबंधित नक्षलवाद्याला अटक करण्यात यश आल्यानंतर बक्षीस देण्यात येईल. शासकीय सेवेतील एखाद्या कर्मचाऱ्याने ही माहिती दिल्यास त्यांना एकूण रकमेच्या पन्नास टक्के रक्कम बक्षीस म्हणून दिली जाईल. १० लाखापर्यंतचे बक्षीस मंजूर करण्याचे अधिकार जिल्हा पोलीस अधीक्षक, २५ लाखापर्यंतचे अधिकार पोलीस उपमहानिरीक्षक आणि १ कोटीपर्यंतचे अधिकार विशेष अभियानाच्या अतिरिक्त पोलीस महासंचालकांना आहेत.

'तेजस'मधील खाद्यपदार्थांत दोष नाही

मुंबई : मडगाव ते दादर मार्गावर धावणाऱ्या तेजस सुपरफास्ट एक्स्प्रेसमधील २६ प्रवाशांची खाद्यपदार्थ खाल्ल्यानंतर तब्येत बिघडल्याची घटना १५ ऑक्टोबर रोजी घडली होती. प्रथमदर्शनी खाद्यपदार्थांतून विषबाधा झाल्याचा अंदाज त्यावेळी वर्तविण्यात आला होता. यानंतर मुंबई पालिकेच्या प्रयोगशाळेत खाद्यपदार्थांचे नमुने पाठवण्यात आले असता अहवालातून तेजसमध्ये पुरवण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थांमध्ये कोणताही दोष नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तेजसमधून त्या दिवशी एकूण २३० प्रवासी प्रवास करत होते.

घटनेनंतर गाडीतील दोघा कर्मचाऱ्यांना सेवेतून निलंबित करण्यात आले. तर कंत्राटदारास कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.

सीजी पॉवर अँण्ड इंडस्ट्रियल सोल्यूशन्स लिमिटेड
(क्रॉम्प्टन ग्रीव्हज् लिमिटेड पूर्वी)
सीआयएन: L99999MH1937PLC002641
नोंदणीकृत कार्यालय: 6वा मजला, सीजी हाऊस, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई - 400 030
दुरध्वनी नं.: 022 - 24237777 फॅक्स नं: 022-24237545
ई-मेल: investorservices@cgglobal.com वेबसाईट: www.cgglobal.com
सूचना
सिक्युरिटीज अँन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सूचीकरण आबंधन आणि प्रकटन आवश्यकता) नियमन, २०१५ च्या नियमन ४७ च्या अनुरोधाने, ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, ३० सप्टेंबर, २०१७ रोजी संपलेल्या दुसऱ्या तिमाही आणि सहामाही अखेरचे अ-लेखापरीक्षित वित्तीय निकाल, स्वतंत्र तसेच एकत्रित अशा तत्त्वांवर, इतर व्यवसायासोबत, विचार आणि मंजूरी घेण्यासाठी कंपनीच्या संचालकीय मंडळाची बैठक ही गुरूवार, ९ नोव्हेंबर, २०१७ रोजी घेण्यात येईल.
सीजी पॉवर अँण्ड इंडस्ट्रियल सोल्यूशन्स लिमिटेड करिता
रूची खन्ना
अनुपालन अधिकारी
स्थळ : मुंबई
दिनांक : २५ ऑक्टोबर, २०१७
स्टॉक इक्सचेंजेसची वेबसाईट: www.bseindia.com/www.nseindia.com

मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड
(रेल्वे मंत्रालय, भारत सरकारची स्वायत्त संस्था)
स्वारस्याच्या अभिव्यक्तीसाठी विनंती
(सल्लागार सेवा- संस्था निवड)
देश भारत.
प्रकल्पाचे नाव : मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प-III
कर्ज क्र./क्रेडिट क्र./मंजुरी क्र.: आयबीआरडी कर्ज : संमत झालेले.
कामाचे नाव : "मुंबई उपनगर रेल सिस्टमच्या बेंचमार्किंग एन्व्हायरोमेंटल परफॉर्मन्सच्या अभ्यासाकरिता" सल्लागार सेवांची तरतूद.
मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड, भारत हे पात्र सल्लागार संस्थांकडून ("सल्लागार") सेवांची तरतूद करण्यासाठी त्यांचे स्वारस्य दर्शविणारे अर्ज मागवीत आहेत. जागतिक बँकेच्या सल्लागाराच्यासंबंधी असलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार क्यूसीबीएस पद्धतीनुसार सल्लागारांची नेमणूक करण्यात येईल. खाली देण्यात आलेल्या कार्यालयाच्या पत्त्यावरून कामकाजाच्या दिवसांमध्ये स. १०.०० ते १७.०० वा.पर्यंत प्राप्त करता येतील. शुद्धिपत्रक जर असल्यास केवळ एमआरव्हीसीच्या संकेतस्थळावरच प्रसिद्ध करण्यात येईल. जर शुद्धिपत्रक जारी करण्यात आले असेल तर त्यासाठी प्रस्तावित बोलीदाराला एमआरव्हीसीच्या संकेतस्थळाला भेट द्यावी लागेल. खाली नमूद पत्त्यावर पूर्ण भरलेल्या स्वारस्याची अभिव्यक्ती (प्रत्यक्ष किंवा ई-मेलद्वारे) २१.११.२०१७ पर्यंत सादर करावयात. स्वारस्याच्या अभिव्यक्तीचा तपशील आणि अटी या www.mrvc.indianrailways.gov.in वर उपलब्ध आहे.
पत्रव्यवहारासाठी पत्ता : अजित शर्मा, कार्यकारी संचालक (इले.), मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड, २ रा मजला, चर्चगेट रेल्वे स्टेशन इमारत, चर्चगेट, मुंबई-४०००२०. दूर. ०२२-२२०७१८८५. फॅक्स : ०२२-२२०९६९७२. ई-मेल : ed_elec@mrvc.gov.in, संकेतस्थळ : www.mrvc.indianrailways.gov.in

भारत सरकार
अणू ऊर्जा विभाग
भाभा अणू संशोधन केंद्र
तांत्रिक सेवा विभाग
उत्तर साइट, ट्रॉम्बे, मुंबई- ४०० ०८५
ई-निविदा मागविणारी सूचना
भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मुख्य अभियंता, तांत्रिक सेवा विभाग, भाभा अणू संशोधन केंद्र, उत्तर साइट, बीएआरसी, ट्रॉम्बे, मुंबई- ४०० ०८५ हे खालील कामाकरिता दोन बोली पद्धतीत ऑन लाइन बाब दर निविदा मागवीत आहेत.
एनआयटी नं. बीएआरसी/टीएसडी/ ९६/ २०१७-१८, कामाचे नाव : बीएआरसी, ट्रॉम्बे, मुंबई- ४०० ०८५ येथील न्यू इंजिनीअरिंग हॉल-९, व हॉल-१० व हॉल-११ च्या कॉन्फरन्स हॉल्सचे फर्निशिंग काम. **अंदाजित खर्च :** ₹ १,९०,००,०००/-. **इसारा रक्कम :** ₹ ३,८०,०००/- **पूर्तता कालावधी :** ०९ महिने. **बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख :** १२.१२.२०१७ (१५.०० वा.)
बोली प्रपत्रे व अन्य तपशील www.tenderwizard.com/DAE किंवा www.barc.gov.in या संकेतस्थळांवरून प्राप्त करता येईल.
साहाय्य/स्पष्टीकरणे याकरिता संपर्क २४×७ @ ९९६९३९५५२२ श्री. रुद्रेश, ई-मेल: rudresh.tenderwizard@gmail.com
मुख्य अभियंता

VITTHALRAO SHINDE SAHAKARI SAKHAR KARKHANA LTD.,
Gangamainagar – Pimpalner, Tal – Madha, Dist- Solapur- 413 210
Tel.: 02183 - 233075,76,56,233500,233511
Fax: 02183- 233005,233500 E-mail –vs.sugar@gmail.com
TENDER NOTICE
Sealed Tenders in prescribed forms are invited from the reputed manufacturers who are on approved list of NCDC / NFCSF / Commissioner of Sugar, Maharashtra state, Pune for MSDH Plant, Integrated spent wash evaporation and standalone spent wash evaporation plant, Spent wash base Incineration Boiler, Turbo Generator, Condensate polishing unit for following turnkey job for. Design, Manufacture, Supply, erection, Commissioning alongwith civil and structural works of following plants.

Sr.No	Details of the Plants	Tender Fee (in Rs.)	EMD (in Rs.)
1	80 KLPD MSDH Plant to produce fuel ethanol from rectified spirit	10,000/-	3,45,000.00
2	Integrated spent wash evaporation and standalone spent wash evaporation plant for 120 KLPD Distillery plant.	25,000/-	7,60,000.00
3	Incineration Boiler, 46 MT/hr (45 Kg/cm2)	25,000/-	20,65,000.00
4	TG set 5.00 MW	15,000/-	4,12,000.00
5	Condensate polishing unit (CPU), for 120 KLPD distillery plant	15,000/-	4,12,000.00

Terms & conditions :
1) Blank Tender forms alongwith terms and conditions will be available at our karkhana site from 26/10/2017 to 21/11/2017 except Sunday i.e. weekly holiday during working hour 9.30 a.m. to 5.30 p.m. on payment of tender fees (GST is applicable for each tender form fee) as mentioned above by cash or demand draft in favour of karkhana payable at Kurduwadi.(Not Refundable)
2) Last date of submission of the tender at karkhana site will be 29/11/2017.
3) EMD as mentioned above should be drawn in favour of Karkhana on any Nationalized Bank payabal at Kurduwadi.
4) Blank tender will be issued only those who are on the approved list of NCDC/NFCSF/ Registered with the Commissioner of Sugar, Maharashtra State, Pune and who have already installed and successfully commissioned at least one plant production evidence indicating performance of plant. Xerox copy of valid registration & Income Tax Clearance Certificates should be submitted.
5) The format of the detailed specifications of the plant and machinery are mentioned in the tender form.
6) Tender to be submitted in Three Separate Envelopes:-
Envelope No.1- Contains Technical Specification.
Envelope No.2- Contains Commercial offer with valid registration certificate with declaration etc.,
Envelope No.3- Contains legal agreement of Technical Collaboration if any with EMD
7) Tender with any deviations in technical specifications or incomplete tenders and tenders without or insufficient EMD and reference will be rejected.
8) Karkhana will not be responsible for the late receipt of tender after due date and time of closing on account of any reason of postal/courier/man reach delay.
9) The tenderer will have to submit the sealed tender as per the tender document only signing each and every page of tender document with company rubber stamp and duly filled in wherever applicable.
10) Karkhana / State Level Machinery Committee reserve the right to accept or reject the tender without assigning any reason there of.
11) Pre bid meeting will be held at Sakhar Sangh Office, Sakhar Sankul, Pune on 16/11/2017 at 11.00 a.m.
12) The tenderer should send their queries, if any in the tender document to karkhana on or before 10/11/2017.
Place : Gangamainagar- Pimpalner **Date :-26-10-2017**
R.S.Ranaware Managing Director
Pandurang Anna Patil Vice Chairman
Babanrao Vitthalrao Shinde M.L.A. & Founder Chairman

भारतीय नौकानयन महामंडळ मर्यादित
(भारत सरकारचा उपक्रम)
नोंदणीकृत कार्यालय: शिपिंग हाऊस, २४५, मॅडम कामा रोड, मुंबई - ४०० ०२१ • वेबसाईट: www.shipindia.com • ट्विटर: @shippingcorp • सीआयएन: L63030MH1950GOI008033
सूचना
याद्वारा सूचना देण्यात येते की, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन्स २९ व ४७ च्या अनुसार कंपनीच्या संचालक मंडळाची सभा सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत **३० सप्टेंबर, २०१७** रोजी संपलेल्या तिमाहीकरिता कंपनीचे अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्ष इतर गोष्टींसमवेत मान्य करण्याकरिता **०३ नोव्हेंबर, २०१७** रोजी मुंबई येथील कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात घेण्याचे निर्धारित केले आहे.
संचालक मंडळाच्या आदेशाद्वारा
भारतीय नौकानयन महामंडळ मर्यादितकरिता
(दिपंकर हल्दार)
स्थळ : मुंबई
तारीख : २६.१०.२०१७
ईडी (विधी कामकाज) व कंपनी सचिव
मालाचे परिवहन. जीवनात परिवर्तन

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/२२१६ ३९६५ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६
ई-मेल : mercindia@merc.gov.i
संकेतस्थळ : www.mercindia.org.in / www.merc.gov.in
जाहिरात क्र. ०९/२०१७-१८
जाहीर सूचना
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीज दर) विनियम, २०१५ मध्ये करावयाच्या प्रस्तावित सुधारणेवर अभिप्राय मागविण्याबाबत
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग त्यांच्या बहु-वर्षीय वीज दर विनियम, २०१५ मधील व्याज दर आणि संचालन व देखभाल खर्चाच्या संबंधातील तरतुदींमध्ये सुधारणा करण्याचा विचार करीत आहे.
सदर विनियमांमध्ये करावयाच्या प्रस्तावित सुधारणेचे प्रारुप आयोगाच्या www.mercindia.org.in / www.merc.gov.in या संकेत स्थळांवर स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.
आयोग या प्रारुप सुधारणेवर लेखी अभिप्राय, सूचना / हरकती मागवित आहे. त्या ६(१+५) प्रतींमध्ये **सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४००००५** यांना व्यक्तिशः किंवा पोस्टाने किंवा फॅक्स किंवा ई-मेलने (फॅक्स क्र. ०२२-२२१६३९७६, ई-मेल : **mercindia@merc.gov.in)** या पत्त्यावर पाठवाव्यात. आयोगास १७ नोव्हेंबर, २०१७ पूर्वी प्राप्त होणारे सर्व अभिप्राय, सूचना आणि हरकती, विनियमांतील या सुधारणेस अंतिम स्वरुप देण्यापूर्वी, आयोगाकडून विचारात घेण्यात येतील.
दिनांक : २६ ऑक्टोबर, २०१७
ठिकाण : मुंबई
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
''प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षण सेवक पदाकरिता अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी आयोजित करण्याबाबत - जाहीर प्रकटन''
शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०१७ करिता ऑनलाइन अर्ज मागविण्याबाबत

वेळापत्रक				
अ. क्र.	कार्यवाहीचा टप्पा	दिनांक व कालावधी		
१	ऑनलाइन अर्ज व शुल्क भरण्याचा कालावधी	०२.११.२०१७ ते २२.११.२०१७		
२	प्रवेशपत्र ऑनलाइन प्रिन्ट काढून घेणे	०१.१२.२०१७ ते ११.१२.२०१७		
३	ऑनलाइन परीक्षेचा दिनांक	१२.१२.२०१७ ते २१.१२.२०१७		
	बॅचनिहाय वेळा	बॅच I ९.०० ते ११.००	बॅच II १२.३० ते २.३०	बॅच III ४.०० ते ६.००

टीप : १) परीक्षाविषयक सर्व माहिती जसे आवेदनपत्र भरणे, परीक्षा शुल्क, शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता, अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिका, मूल्यमापन व निकालविषयक सविस्तर माहिती व शासननिर्णय त्यातील प्रत्येक सूचना काळजीपूर्वक वाचूनच अर्ज भरावा.
२) अर्ज भरताना परीक्षार्थींनी इ. १०वी, इ. १२वी, डी.टी.एड./ बी.एड. पदवी, पदव्युत्तर इ. शैक्षणिक माहिती तसेच दिव्यांगत्व, राखीव प्रवर्गाचे असल्यास जात इत्यादींबाबतची माहिती मूळ प्रमाणपत्रावरूनच भरावी. स्कॅन केलेला नवीनतम रंगीत फोटो व स्कॅन केलेली स्वाक्षरी ऑनलाइन आवेदनपत्रात अपलोड करावयाची असल्याने सोबत ठेवावी.
३) सदर परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांशी सर्व संपर्क Online, SMS सुविधा यांद्वारे होऊ शकतो. त्यामुळे उमेदवारांनी स्वतःचा भ्रमणध्वनी क्रमांक व E-mail ID अचूक द्यावा.
४) सदर जाहिरातीनुसार उमेदवारांना केवळ Online अर्ज करता येईल. परीक्षेचे शुल्क ऑनलाइन बँकिंग, क्रेडिट/ डेबिट कार्ड इ.द्वारे ऑनलाइन पद्धतीने भरावे लागेल (चलनाद्वारे ऑफलाइन शुल्क भरता येणार नाही).
५) ऑनलाइन आवेदनपत्रासोबत कोणत्याही कागदपत्रांच्या प्रती जोडण्याची आवश्यकता नाही.
६) मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीस अधीन राहून उमेदवारांना परीक्षेस तात्पुरता प्रवेश दिला जाईल व निकाल घोषित केला जाईल. ऑनलाइन आवेदनपत्रामध्ये भरलेल्या माहितीत व मूळ कागदपत्रांमध्ये तफावत आढळून आल्यास निकाल रद्द करण्यात येईल.
७) सदर चाचणी सर्व जिल्ह्यांच्या मुख्यालयी आयोजित करण्यात येणार आहे. परीक्षार्थींनी परीक्षा केंद्राची निवड करताना ३ परीक्षा केंद्रांची निवड करणे सक्तीचे आहे. प्रथम निवड केलेल्या परीक्षा केंद्रावर जागा उपलब्ध नसल्यास क्र. २ किंवा ३ वर नमूद केलेल्या परीक्षा केंद्राचा विचार होईल.
८) परीक्षा फी, परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेकरिता नोंदणी व इतर अधिक माहितीकरिता उमेदवारांनी संबंधित वेबसाइटला (https://www.mahapariksha.gov.in) भेट द्यावी.

माहिती स्रोत :

हेल्पलाइन क्रमांक	माहितीकरिता Web site
1800-3000-1656	https://www.mahapariksha.gov.in

स्थळ : पुणे
दिनांक : २६.१०.२०१७
स्वाक्षरी/-
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.
डीजीआयपीआर/२०१७/२०१८/३८२०